महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.मरासाप्रप(सीईटी)क/कृशिप्र-१३२६/प्र.क्र.१०/जाहीर सूचना क्र.१०/महाविद्यालय/१९९४, दिनांक: १४/०८/२०२६

## जाहीर सूचना क्र. १०

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांच्या आदेशानुसार रंगनाथ महाराज कृषी महाविद्यालय, नाव्हा, ता. जि. जालना या महाविद्यालयाची प्रवेश क्षमता १२० विद्यार्थी प्रतिवर्ष करण्याबाबत....

**संदर्भ :**
१. महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे दिनांक **१४/०८/२०२६** चे पत्र.
२. मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांचा **रिट याचिका क्र. ९१८८/२०२६** मधील दिनांक ०६/०८/२०२६ रोजीचा आदेश.
३. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाची **जाहीर सूचना क्र. ०५, दिनांक २९/०७/२०२६.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतील कृषी व कृषी संलग्न व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांची शैक्षणिक वर्ष **२०२६-२७** मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत राबविण्यात येत आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत **कृषी महाविद्यालय, रंगनाथ महाराज विश्रांती मठ, नाव्हा, ता. जि. जालना** या महाविद्यालयाची मागील शैक्षणिक वर्षामध्ये **१२० विद्यार्थी प्रतिवर्ष** अशी प्रवेश क्षमता होती. तथापि, आवश्यक शिक्षकवर्गीय कर्मचारी व प्रयोगशाळेतील सोयी-सुविधांच्या कमतरतेच्या अनुषंगाने सदर महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी एका तुकडीची म्हणजेच **६० विद्यार्थी प्रतिवर्ष** प्रवेश क्षमता विचारात घेऊन कृषी विद्यापीठाकडून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते.

त्यानुसार, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या **जाहीर सूचना क्र. ०५, दिनांक २९/०७/२०२६** अन्वये सदर महाविद्यालयाचा शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये **६० विद्यार्थी प्रतिवर्ष प्रवेश क्षमतेसह** समावेश करण्यात आला होता.

तथापि, संबंधित महाविद्यालयाने मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे **रिट याचिका क्र. ९१८८/२०२६** दाखल केली आहे. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक **०६/०८/२०२६** रोजी आदेश पारित करून, महाविद्यालयाची प्रवेश क्षमता १२० वरून ६० करण्यासंदर्भातील संबंधित **ठराव क्र. ७७/२२३, दिनांक २०/०७/२०२६** यास अंतरिम स्थगिती (Ad-interim relief) दिली आहे.

त्यानुसार, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी संदर्भ क्र. १ अन्वये **कृषी महाविद्यालय, रंगनाथ महाराज विश्रांती मठ, नाव्हा, ता. जि. जालना** या महाविद्यालयाची प्रवेश क्षमता **१२० विद्यार्थी प्रतिवर्ष** याप्रमाणे जागा वाटपानुसार प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्याबाबत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास कळविले आहे.

त्याअनुषंगाने, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) मध्ये सदर महाविद्यालयाची सुधारित प्रवेश क्षमता खालीलप्रमाणे राहील:

| **महाविद्यालयाचा सांकेतांक, नाव व पत्ता** | **वर्गवारी व वार्षिक शुल्क** | **पूर्वी प्रसिद्ध प्रवेश क्षमता** | **सुधारित प्रवेश क्षमता** |
|---|---|---|---|
| **सांकेतांक ११२८९ कृषी महाविद्यालय, रंगनाथ महाराज विश्रांती मठ, नाव्हा, ता. जि. जालना** | वर्गवारी ब शुल्क रु. ६१,५००/- | ६० | १२० |

त्यामुळे, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या **जाहीर सूचना क्र. ०५, दिनांक** २९/०७/२०२६ मध्ये सदर महाविद्यालयासाठी नमूद करण्यात आलेली ६० **विद्यार्थी प्रतिवर्ष प्रवेश क्षमता आता** १२० **विद्यार्थी प्रतिवर्ष** अशी सुधारित समजण्यात यावी.

**सदर महाविद्यालयाची १२० विद्यार्थी प्रतिवर्ष ही प्रवेश क्षमता मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल रिट याचिका क्र. ९१८८/२०२६ मधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील, याची सर्व संबंधित उमेदवार, पालक व संस्थांनी नोंद घ्यावी.**

सदर महाविद्यालयातील सुधारित प्रवेश क्षमतेनुसार उपलब्ध होणाऱ्या जागांचा समावेश शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या केंद्रीभूत प्रवेश प्रवेश प्रक्रियेमध्ये करण्यात येईल व जागांचे वाटप लागू नियम व प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने करण्यात येईल.

उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील सर्व अद्ययावत सूचना, वेळापत्रक तसेच महाविद्यालयांची माहिती नियमितपणे https://cetcell.mahacet.org या संकेतस्थळावर पाहावी.

सदर जाहीर सूचनेसोबत उपरोक्त **संदर्भ क्र. २ मधील मा. उच्च न्यायालयाचा आदेश उमेदवारांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करून देण्यात येत आहे.**

**सही/-**

**(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी**
**महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा**
**(सीईटी) कक्ष, मुंबई**

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
BENCH AT AURANGABAD

8 WRIT PETITION NO. 9188 OF 2026

RANGNATH MAHARAJ AGRICULTURE COLLEGE NAVHA THR ITS ACTING PRINCIPAL SATISH R PAWAR

*VERSUS*

THE STATE OF MAHARASHTRA THROUGH PRINCIPAL SECRETARY AND OTHERS

...

Advocate for the Petitioner : Mr. S.B. Talekar i/by. M/s. Talekar And Associates
AGP for Respondent/State : Mr. S.K. Tambe

...

**CORAM : NITIN B. SURYAWANSHI AND ABASAHEB D. SHINDE, JJ.**

**DATE : 06.08.2026**

**PER COURT :**

. The intake capacity of the petitioner is reduced from 120 to 60 students on the ground that, there is no adequate teaching staff with the petitioner.

2. Mr. Talekar, learend Advocate for the petitioner, has pointed out from the documents annexed to the petition, that the petitioner tried to take interviews for the teaching staff however, due to absence of the University nominees, the interviews could not take place. Thereafter, walk-in-interviews were conducted by the petitioner and appointments of adequate teaching staff were made in terms of Section 144 of the Maharashtra Agricultural Universities (Krishi Vidyapeeths) Statutes, 1990. He further submits that the impugned resolution is passed without giving an opportunity of hearing to the petitioner.

3. Prima facie, we are of the view that petitioner has made out a

"Disclaimer Clause
Authenticated Copy
is not a Certified Copy"

Scanned with OKEN Scanner

case for grant of Ad-interim relief.

4. Issue notice to respondents, returnable on 03.09.2026. Learned AGP waives service for respondent/State. In addition, private service is permitted, as per rules.

5. In the meanwhile, there shall be Ad-interim stay to the impugned Resolution No.77/223 dated 20.07.2026 at Page No.101 of the petition.

Sd/-

( ABASAHEB D. SHINDE, J. )

Sd/-

( NITIN B. SURYAWANSHI, J. )

VSJ

"Disclaimer Clause
Authenticated Copy
is not a Certified Copy"

Authenticated Copy

07/08/26

Section Officer.
High Court of Bombay
Bench at Aurangabad

7/8/26

Scanned with OKEN Scanner